आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ डिसेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महापालिका निवडणुकांसाठी अर्ज भरायला उद्यापासून सुरूवात

- माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

- लवासा प्रकल्पाला दिलेल्या परवानग्यांची सीबीआय चौकशीची मागणी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- शेअर बाजारात जोरदार तेजी, निफ्टी पुन्हा २६ हजाराच्या वर

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीचे उमेदवारी अर्ज भरायची प्रक्रिया उद्यापासून सुरू होणार आहे. ३० डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया चालणार असून अर्जांची छाननी ३१ डिसेंबर रोजी होईल. २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्हांचं वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होईल, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त, पारदर्शक वातावरणात व्हावी यासाठी पालिका प्रशासन आणि निवडणूक यंत्रणा आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबवत असल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिली आहे. पालिका निवडणुकीसंदर्भात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींबरोबर महापालिका मुख्यालयात आज एक बैठक घेण्यात आली, त्यात गगराणी बोलत होते. यावेळी त्यांनी निवडणुकीच्या विविध प्रशासकीय, तांत्रिक आणि कायदेशीर बाबींची सविस्तर माहिती दिली. या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्ष, त्यांचे पदाधिकारी तसंच कार्यकर्त्यांनी आचारसंहितेचं पालन करावं आणि पालिका प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

पुणे महानगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना प्रचार सभांसाठी महापालिकेची मैदानं, शाळांची मैदानं, मोकळी जागा तसंच चौकांचा वापर करता येईल. यासाठी महापालिका प्रशासनानं अटी आणि शर्तींची नियमावली, तसंच दरपत्रक जाहीर केलं आहे. प्रचारादरम्यान रस्ते किंवा पदपथावर खड्डे केले किंवा नुकसान झालं तरस दंड आकारला जाणार आहे. निवडणूक आयोगानं घालून दिलेल्या सर्व आचारसंहितांचं पालन करणं बंधनकारक असेल. असं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष आहे, हे नगरपालिका निवडणुकांच्या निकालातून स्पष्ट झालंय, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. त्यांनी आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी नागपूर जिल्ह्यातल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले…

**- - होल्ड - फडनवीस बाइट - -**

नागपूर जिल्ह्यातल्या सावनेर, रामटेक नगरपालिका काँग्रेस मुक्त केल्या. कामठी शहरात नगरपंचायत स्थापन झाल्यापासून पहिल्यांदाच कमळ फुललं, असे अनेक विक्रम या निवडणुकांनी केले असं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या विजयी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचं दोन दिवसांचं शिबीर पुण्यात यशदा इथं घेणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. त्यांच्या हस्ते पुण्याजवळच्या फुरसुंगी उरुळी देवाची इथल्या नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. नगरपरिषद, नगरपालिकेत काम कसं करायचं, पाठपुरावा कसा करायचा, कामाचा दर्जा कसा राखायचा, याबाबत या शिबिरात मार्गदर्शन करणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

<><><><><>

महायुतीत कोणताही ताण नाही, तिन्ही पक्षांमध्ये चांगले संबंध असून चर्चा करून निर्णय घेऊ, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष, आणि १ हजार ६ नगरसेवक निवडून आल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. अत्यंत विपरित परिस्थितीतलं हे यश महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भंडारा नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक 3 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार करुणा राऊत यांचं नावच इव्हीएमवर नसल्याप्रकरणी 7 कर्मचाऱ्यांना निलंबित केलं आहे. तर दोन अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचं जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं याप्रकरणी निवडणूक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

**<><><><><>**

सदनिका घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयानं सुनावलेल्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांची आमदारकी कायम राहणार आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना आमदार म्हणून अपात्र ठरवलं जाणार नाही, असं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारला नोटीस जारी केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे दोषी ठरले होते. या प्रकरणात त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली होती, मात्र शिक्षा कायम ठेवली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><><>**

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानग्या दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी २०२३ सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं

फेटाळली आहे. पोलिसांनी याबाबतीत एफआयआर दाखल करावा असा आदेश न्यायालयानं देण्यासाठी कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळल्याचं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

याचिकाकर्त्याने वारंवार याच आरोपांची याचिका केली असल्याने न्यायालयाने त्याची नोंद घेऊ नये अशी हस्तक्षेप याचिका यावर्षीच्या मार्च महिन्यात शरद पवार यांनी केली होती.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ६३८ अंकांची वाढ झाली आणि तो ८५ हजार ५६७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २०६ अंकांची वाढ नोंदवत २६ हजार १७२ अंकांवर बंद झाला.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यातल्या बिबट्यांचा वाढता वावर आणि मानवी वस्त्यांवरील हल्ल्यांच्या घटना रोखण्यासाठी आधुनिक यंत्रणेचा वापर करण्याच्या सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वन विभागाला दिल्या आहेत. संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग इथं बिबट्याच्या हल्ल्यात दगावलेल्या सिद्धेश सुरेश कडलग याच्या कुटुंबीयांची आज सांत्वनपर भेट घेतल्यानंतर विखे पाटील बोलत होते.

<><><><>

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये पैशांच्या वापरावर आळा घालण्यासाठी मुंबई इथल्या आयकर विभागाने चोवीस तास सुरू राहणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. निवडणूक काळात प्रचारासाठी बेहिशेबी रोकड, मौल्यवान वस्तु किंवा इतर प्रलोभनांबाबत नागरिकांनी जागरुक राहावं आणि ७७३८११३७५८ या क्रमांकावर त्याविषयीची माहिती द्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><>

कांद्याच्या बाजार भावांच्या साखळीवर शेतकरी वर्गाचं नियंत्रण राखण्याच्या उद्देशानं उभारण्यात येणार असलेल्या नाशिकमधल्या नियोजित ‘ कांदा भवन ‘ प्रकल्पाला जयगावच्या शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी

संघटनेच्या वतीनं उभारल्या जाणार असलेल्या या प्रकल्पाबाबत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत दिघोळे यांनी काल सकाळी सिन्नर इथं स्थानिक शेतकऱ्यांना माहिती दिली. नियोजित कांदा भवन जयगाव इथंल्या दोन एकर क्षेत्रावर उभारलं जाणार असून त्याकरता सुमारे ५ कोटी रुपये खर्च येणार असल्याचं दिघोळे यांनी सांगितलं. हा निधी शेतकऱ्यांकडून उभारला जाणार असल्याचंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><>**

पालघर इथं २०२२मध्ये झालेल्या एका बांधकाम विकासकाच्या मृत्युप्रकरणी विशेष मकोका न्यायालयाने आरोपी सुभाष सिंग ठाकूर याची पोलीस कोठडी २९ डिसेंबरपर्यंत वाढवली आहे. ठाकूर याची पोलीस कोठडी संपल्यामुळे त्याला आज न्यायालयात हजर करण्यात आलं होतं.

**<><><><>**

राज्य सरकारनं टाटा समूहाच्या मदतीनं चंद्रपूरमध्ये उभारलेल्या पंडित दीनदयाल कॅन्सर हॉस्पिटलचं आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं.

**<><><><>**

धुळे जिल्ह्यात साक्री तसंच पिंपळनेर हद्दीमधल्या शेतमालाची चोरी करून शेतकऱ्यांना जेरीला आणणाऱ्या चोरांच्या टोळीला गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकानं आज अटक केली. या टोळीत पाच चोरांचा समावेश असून पोलिसांनी त्यांच्याकडून कापुस तसंच सोयाबीनसह बाजरीचा सुमारे दहा लाख रुपये किमतीचा शेतमाल ताब्यात घेतला आहे. या टोळीनं शेतमाल चोरीचे ७ गुन्हे केलं असल्याचं उघड झालं आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**